पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 15/03/2020 (रविवार)
(सायंकाळ)

## निष्काळजीपणामुळे मृत्यू

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 2 कि.मी. अंतरावरील शिवनगर गिरड, उमरेड येथे दिनांक 31/01/2020 चे 10:00 वा. 12:30 वा. दरम्यान प्रकाश नारायण डडमल, वय 40 वर्ष, रा. रेल्वे स्टेशन झोपडपटटी मंगळवारीपेठ उमरेड हे आरोपी क्र. 1) गोकुल चंद्रशेखर गावंडे, रा. शिवनगर उमरेड याच्या घरी पेंटींग कामाला असता आरोपी क्र 1 ने नगर परिषदेची घरबांधकामाची परवानगी न घेता अवैधरित्या घराचे बांधकाम केले. त्यामुळे यातील प्रकाश डडमल हा आरोपी क्र 01 चे घराचे पेंटींग करीत असतांना म.वि मंडळ चे 11 केव्ही विदयुत ताराचा स्पर्श होउन त्यांना करंट लागुन त्यांचा मृत्यू झाला. आरोपी क्र 02) अशोक बालकेश्वर सिंग कुशवाह, रा. बुधवारीपेठ उमरेड यांनी पेंटींग कामाला बासाचे बल्या ताराला लागुन बांधल्या व आरोपी क्र 03) उत्तम मधुकर दुधपचारे, रा. बुधवारीपेठ उमरेड यांनी सदर मृतकास त्या ठिकाणी पेंटींगचे काम करण्यास प्रवृत्त केले सदर तीन्ही आरोपींनी पेंटींग कामाकरिता कोणतीही उपाययोजना न करता निष्काळजीपणाने हयगय केल्याने त्यामुळे मृतकाला विद्युत ताराचा करंट लागुन मरण पावल्याचे मर्ग क्र. 02/2020 क. 174 जाफौ. च्या तपासात निष्पन्न झाल्याने चौकशीवरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवा अजितसिंग ठाकुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास परि पोउपनि श्री खोब्रागडे हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर मौजा वलनी शिवार येथे दिनांक 14/03/2020 चे 12:00 वा. सुमारास विश्वास मोतीराम दहीसकर, वय 62 वर्ष, रा. मौजा वलनी यांनी फिर्यादी पासुन किरायाने घेतलेल्या घराच्या भिंतीला असलेल्या खिडकीस दुपट्टयाने बांधुन गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुनिल विश्वास दहीसकर, वय 36 वर्ष, रा. वलनी यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ नागपूरे 8888821360 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर